लोकमत

# एसएनडीटीच्या कुलसचिवपदी नांदवडेकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मुंबई येथील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठाच्या कुलसचिवपदी डॉ. विलास दत्तू नांदवडेकर यांची नियुक्ती झाली. त्याबाबतचे पत्र त्यांना या विद्यापीठाकडून सोमवारी मिळाले. मूळ नेसरी (ता. गडहिंग्लज) येथील असलेल्या डॉ. नांदवडेकर यांनी यापूर्वी शिवाजी विद्यापीठाच्या



कुलसचिवपदाची जबाबदारी सांभाळली होती. डॉ. नांदवडेकर हे पुणे येथील सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालकपदी कार्यरत होते. त्यांची दि. १५ नोव्हेंबर २०१६ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी नियुक्ती झाली होती. या पदाचा पाच वर्षांचा कालावधी संपल्यानंतर ते गेल्या नऊ महिन्यांपूर्वी सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये रूजू झाले होते.

शिवाजी विद्यापीठाशी संबंधित असणाऱ्या डॉ. नांदवडेकर यांच्या माध्यमातून दुसऱ्यांदा मिळाली. गेल्या महिन्यात डॉ. आर. के. कामत यांची होमी भाभा विद्यापीठाच्या पहिल्या कुलगुरुपदी नियुक्ती झाली. या नियुक्तीद्वारे शिवाजी विद्यापीठाचा सन्मान झाला आहे.

सकाळ

# डॉ. नांदवडेकर एसएनडीटीचे कुलसचिव



डॉ. नांदवडेकर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची आज मुंबई येथील एसएनडीटी संस्थेच्या कुलसचिवपदी निवड झाली. डॉ नांदवडेकर यापूर्वी सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये कार्यरत होते. त्यानंतर ते शिवाजी विद्यापीठात कुलसचिवपदावर रुजू झाले. सहा महिन्यांपूर्वी त्यांचा विद्यापीठातील कार्यकाळ संपला होता. आज त्यांची नियुक्ती एसएनडीटी संस्थेचे कुलसचिव म्हणून करण्यात आली. विलास नांदवडेकर मूळचे गडहिंग्लज तालुक्यातील नेसरी या गावचे आहेत.